MHWS100015982023

# निशाणी क्रमांक ०५ व १५ वरील आदेश

किशोर आश्रुजी गायकवाड **विरूध्द** गणेश माणिक गायकवाड

प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी यांनी (नि.क्र.५) व प्रतिवादी यांनी (नि.क्र.१५) वर दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ सहकलम १५१ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणे करीता अर्ज दाखल केलेले आहेत.

**दावा मिळकतीचे वर्णन** :-

०२. दावा मिळकत (अ) मौजे कळमेश्वर, ता. मालेगांव, जि. वााशिम शिवारातील गट क्र.२११ मधील १ हेक्टर ०३ आर क्षेत्रफळाच्या शेत जमीनीच्या चतुःर्सिमा पुर्वेला- वादीचा भाऊ सुनील यांचे हिस्यावर वाटणीनुसार गट क्र.२११ मधील १ हे ०४ आर क्षेत्रफळाची शेतजमीन, पश्चिमेला- रमेश प्रल्हाद गायकवाड व अशोक माणिक गायकवाड ह्यांची शेतजमीन, दक्षिणेला- तुकाराम माणीक गायकवाड व उत्तरेला- वादीच्या ताब्यातील वाद जमीनीतील हद्दीत असलेला पाणी जाण्याचा नाला व त्यापलीकडे अशोक माणिक गायकवाड ह्यांची शेतजमीन.

०३. दावा मिळकत (ब) मौजे कळमेश्वर, ता. मालेगांव, जि. वााशिम शिवारातील गट क्र.२०९ मधील वादीची २ एकर ०२ गुंठे क्षेत्रफळाच्या शेत जमीनीच्या चतुःर्सिमा पुर्वेला- सुमंता दशरथ गायकवाड हयांची शेतजमीन, पश्चिमेला- प्रतिवादी गणेश माणिक गायकवाड यांची शेत जमीन, दक्षिणेला- पाणी वाहुन जाणारा लहान पाट असुन सदर शेत जमीन मोतीराम गायकवाड हयांची असून तिचा गट क्र.२०९ मधील जमीन व उत्तरेला- मोठा लाना व त्यापलीकडे कळमेश्वर शिवारातील शेत जमीन. (वरील दोन्हीही चतुःर्सिमेच्या आतील शेतजमीनीस यापुढे ''**दावा मिळकत**'' असे संबोधण्यात येईल )

०४. वादी यांची थोडक्यात केस अशी की, वादीचे कथनानुसार दावा मिळकत-अ ही वादीने हरी कु-हे यांच्याकडून १९९८ साली खरेदीखताने विकत घेतलेली आहे. त्यापुर्वी मिळकत ही रामप्रसाद भुतडा यांच्या कब्जे वहिवाटीत होती. मिळकत ही रामप्रसाद भुतडा

यांच्या कब्जेवहिवाटीत असतांना रामभाऊ गायकवाड, मोतीराम गायकवाड, प्रल्हाद गायकवाड, माणिक गायकवाड, अर्जुना गायकवाड, चिंतामण नवबौध्द, वामन नवबौध्द यांच्याविरुध्द रामप्रसाद भुतडा यांनी नि.दि.दा.क्र.१३३/८२ हा दावा दाखल केला होता व त्या दाव्याचा निकाल होवून प्रतिवादी यांनी संबंधीत वादी– रामप्रसाद भुतडा यास पुर्व–पश्चिम धु–याने जावे लागत असल्याने प्रतिवादी हे वादीला हरकत अडथळा करणार नाही असा आदेश पारीत करण्यात आला होता. सदर दाव्यातील माणिक गायकवाड हे प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी गणेश गायकवाड यांचे वडिल होते व त्यांना सदर रस्ता हा मान्य होता. सदर रस्त्या हा प्रतिवादीने दिनांक ०१.०७.२०१६ रोजी अडविलेला असल्याने वादीला त्याच्या मिळकतीत जाणे कठीण झाले आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दाखल केलेला आहे.

०५. तसेच वादीचे दावा मिळकत– अ मध्ये वादीच्या जमीनीच्या पश्चिम बाजूने पाणी वाहून जाण्याचा पाट गेलेला आहे. त्या पाटात प्रतिवादी यांना कोणतेही पाणी सोडण्याचा अधिकार नाही. तरी देखील प्रतिवादी हे त्याचया जमीनीचे पाणी पाटात सोडत असल्यामुळे वादीचे नूकसान होत नाही. त्यामुळे त्याअनुषंगाने देखील वादीने तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी केलेली आहे.

०६. प्रतिवादीने निशाण १४ वर म्हणणे दाखल करून दाव्यातील सर्व कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादीच्या कथनानुसार वादीस त्याने नमूद केलेल्या रस्त्याने जाण्याचे कधीच काम पडत नव्हते व त्याअनुषंगाने कथन केलेला मजकूर हा काल्पनिक असल्याचे प्रतिवादीने कथन केलेले आहे. तसेच तथाकथीत पाटाच्या पाण्याच्या संदर्भातील मजकूर देखील प्रतिवादीने नाकारलेला असून वादीनेच पाटाची जागा वहितीत आणल्याचे कथन केले आहे व वादीच्या सदर कृत्यामुळे प्रतिवादीचे नूकसान होत असल्याचे कथन केले आहे. याउलट प्रतिवादीने प्रतिदावा आणुन वादी हाच प्रतिवादीचे मिळकतीस हरकत अडथळा करत असल्याची कथने प्रतिवादीने केलेली आहे. त्यांच्या कथनानूसार गट क्र.२१० ची जमीन ही त्यांची असून त्या मिळकतीशी वादीचा कोणताही हक्क व हितसंबंध नाही. तसेच सदर शेतजमीनीचा नैसर्गिक उतार दक्षिणेकडे असल्याने पुर्वेपासून पाणी वाहून जाण्याची तशी

वहिवाट आहे. याउलट वादीनेच त्याचे शेतातील पाणी प्रतिवादीचे शेतापर्यंत आणुन सोडल्याने प्रतिवादीचे शेतात पाणी घुसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यासंदर्भात प्रतिवादीने ०९.१०.२०१६ रोजी वादीस भेटून विनंती केली असता वादीने प्रतिवादीस धमकी दिली व त्यामुळे प्रतिवादीने प्रतिदावा दाखल करून त्याचे कब्जेवहिवाटीत वादीने हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातुर्त मनाईची मागणी केलेली आहे. त्याला वादीने निशाण १७ अन्वये उत्तर देवून सर्व कथने नाकारलेली असून केवळ वादीला त्रास देण्यासाठी व खोटी कथने करून खोटा प्रतिदावा करून खोटा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दाखल केल्याचे कथन केलेले आहे.

०७. अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे यावरुन पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यांना मी माझी कारणांसहित उत्तरे यापुढे नमूद करीत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस सिध्द करतात काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| २. | सोईस्करतेची तुला वादींच्या बाजुने आहे असे ते सिध्द करतात का ? | **अंशतः होकारार्थी** |
| ३. | मागणी केलेप्रमाणे तुर्तातुर्त मनाई न दिलेस वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. असे वादी सिध्द करतात काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| ४. | प्रतिवादी प्रथमदर्शनी केस सिध्द करतात काय ? | **नकारार्थी** |
| ५. | सोईस्करतेची तुला प्रतिवादीच्या बाजुने आहे असे ते सिध्द करतात का ? | **नकारार्थी** |
| ६. | मागणी केलेप्रमाणे तुर्तातुर्त मनाई न दिलेस प्रतिवादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. असे वादी सिध्द करतात काय ? | **नकारार्थी** |
| ७. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

०८. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्राचा योग्य ठिकाणी उल्लेख करण्यात आलेला आहे.

**मुद्दा क्रमांक १ ते ६ च्या अनुषंगाने** :

०९. सदरचे चारही मुद्दे एकमेकांशी सल्लग्न असल्याने पुनरावृत्ती टाळणेसाठी मी ते एकत्रीत विचारात घेत आहे.

**वादीचे तथाकथीत वहिवाटीचे रस्त्याचे अडथळ्याच्या मागणीच्या अनुषंगाने कारणमिमांसा–**

१०. प्रस्तुत प्रकरणी वादीतर्फे विधीज्ञांनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणे युक्तीवाद करून प्रतिवादीने तथाकथीत रस्ता अडविल्याचे व त्यांच्या शेताचे पाणी वादीच्या हद्दीत काढून दिल्याने वादीचे नूकसान होत असल्याचा युक्तीवाद केला. त्याच्या पृष्ठार्थ वादीने निशाणी ४ अनुक्रमांक १ व २ वरील दावा मिळकतीचे तसेच प्रतिवादीच्या मिळकतीचे सातबारा उतारे दाखल केलेले आहेत. तसेच निशाण ४ अनुक्रमांक ४ व ५ वर दावा मिळकतीचे हस्तलिखीत नकाशे दाखल केलेले आहेत व निशाण ४ अनुक्रमांक ६ वर नि.दि.दा.क्र.१३३/८२ ची हुकूमनाम्याची प्रत दाखल केलेली आहे. याठिकाणी उल्लेखीत करण्याची बाब अशी आहे की, प्रस्तुत प्रकरणी यापुर्वी देखील निशाण ५ वर युक्तीवाद करण्यात आला असुन त्यामध्ये प्रस्तुत प्रकरणी कोर्ट कमिशनर यांची देखील नेमणूक करण्यात आलेली होती. सदर कोर्ट कमिशनर यांनी मोकास्थळ पाहणी करून तसा अहवाल व नकाशा देखील निशाण २६ वर दाखल केलेला आहे.

११. सदर निशाण २६ वरील अहवालाचे सकृतदर्शनी अवलोकन केले असता गट क्र. २०९ व २१० चे दरम्यान ०७ ते ०८ फुट रूंद रस्ता असल्याचे व तो रस्ता पुढे प्रतिवादी– गणेश माणिक गायकवाड यांचे शेतापर्यंत जात असल्याचे व तिथुन पुढे रस्ता बंद असल्याचे दिसुन येते. प्रतिवादीने सदर अहवाल न्यायालयीन आदेशाचे पालन न करता दिल्याने हरकत घेतलेली आहे. याठिकाणी प्रतिवादी यांनी तथाकथीत रस्ता अडविला नसल्याचे तसेच दावा हा चालण्यास पात्र नसल्याचे कथन केलेले आहे. प्रतिवादींनी सदरचा

नि.दि.दा.क्र.१३३/८२ मधील हुकूमनामा देखील वादी व प्रतिवादी हे सदर दाव्याचे पक्षकार नसल्याने बंधनकारक नसल्याचा युक्तीवाद केला आहे. सकृतदर्शनी वादी व प्रतिवादी हे सदर दाव्याचे पक्षकार नाहीत ही देखील बाब सत्य आहे. परंतू वादी यांनी दावा मिळकत ही १९८२ साली सदर मिळकतीचे पुर्वहक्कदार हरी कु–हे यांच्याकडून विकत घेतल्याचे तसेच हरी कु–हे यांनी रामप्रसाद भुतडा यांच्याकडून विकत घेतल्याचे सकृतदर्शनी दिसते. तसेच सदर हुकूमनामा हा तडजोड हुकूमनामा असल्याचे व त्यामध्ये प्रतिवादीचे वडील देखील पक्षकार असल्याचे दिसुन येते व त्यामध्ये वादी कथन करतो तसा तथाकथीत रस्ता असल्याबाबत सकृतदर्शनी दिसुन येते. तसेच कमिशन अहवाल नि.क्र.२६ वरून देखील रस्ता हा प्रतिवादीच्या शेतापर्यंत असल्याचे व तिथुन पुढे बंद असल्याचे आढळल्याचे दिसते. त्यामुळे सकृतदर्शनी वादीचे कथनात तथ्य दिसते. याठिकाणी प्रतिवादी यांनी निशाण २३ वरून कळमेश्वर गाव नकाशाचा आधार घेवून तसा रस्ता अस्तित्वात नसल्याचा युक्तीवाद केला. परंतू मोका पाहणी अहवाल व नि.दि.दा.क्र.१३३/८२ मधील हुकूमनामा यावरून सदर रस्ता असल्याचे दिसते. त्यामुळे सकृतदर्शनी प्रतिवादीचे कथनात तथ्य दिसत नाही व एकंदरित सकृतदर्शनी प्रतिवादीने वादी कथन करतो तो रस्ता वहिवाटीस हरकत अडथळा केल्याचे दिसते. तसेच त्याअनुषंगाने सकृतदर्शनी दाव्याचा समतोल व अपरिमित नुकसानीचे तत्व हे देखील वादीचे बाजुने आहेत.

**वादीचे मिळकतीत प्रतिवादीने नाल्याचे पाणी सोडू नये च्या मागणीच्या अनुषंगाने कारणेमिमांसा–**

१२. पुढे, प्रस्तुत प्रकरणी वादीने प्रतिवादींनी त्यांच्या शेताचे पाणी वादीच्या नाल्यामध्ये सोडू नये व नाल्यास ईजा पोहोचवू नये अशी देखील तुर्तातुर्त मनाईची मागणी केलेली आहे. परंतु त्याअनुषंगाने सकृतदर्शनी कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच त्याअनुषंगाने कमिशन अहवाल (नि.क्र.२६) मध्ये देखील प्रतिवादी तसे करत असल्याबाबत नमूद नाही. सबब, सदर बाब सकृतदर्शनी सिध्द होत नाही व त्याअनुषंगाने मागणीस वादी पात्र राहत नाही.

**प्रतिवादीचे मिळकतीस वादीने हरकत अडथळा करू नये च्या मागणीच्या अनुषंगाने**

## कारणेमिमांसा–

१३. याठिकाणी प्रतिवादीने देखील प्रतिदावा करून प्रतिदाव्यातील दावा मिळकतीस वादींनी हरकत अडथळा करू नये अशी मागणी केलेली आहे. परंतु त्यासंदर्भात कोणताही सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही व कमिशन अहवालमध्ये देखील तशी बाब सकृतदर्शनी नमूद नाही. सबब, सदर बाब सकृतदर्शनी सिध्द होत नाही व त्याअनुषंगाने मागणीस प्रतिवादी पात्र राहत नाही. वर नमूद कारणांकरीता मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर अंशतः होकारार्थी व मुद्दे क्र. ४ ते ६ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.७ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज (निशाण क्र.५) अंशतः **मंजूर** करणेत येत आहे.

२. प्रतिवादीने दाव्याचा अंतिम निकालापावेतो दावा मिळकत अ मध्ये जाणा–या पुर्वापार वहिवाटीचे रस्त्यामध्ये स्वतः अगर त्याचे नोकर, नातेवाईक वा अन्य कोणीही रस्त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा करू नये असा मनाई हुकूमाचा आदेश पारीत करण्यात येत आहे.

३. प्रतिवादीचा अर्ज (निशाण क्र.१५) **नामंजूर** करणेत येत आहे.

AMIT SUNIL KOSHTI
Digitally signed by AMIT SUNIL KOSHTI
Date: 2026.04.24 18:52:29 +0530

स्थळ : मालेगांव.

दिनांक : २४.०४.२०२६.

( **अ. सु. कोष्टी** )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मालेगांव.

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, contents of this PDF file is same word to word, as per original Order :- | | |
| 1. Name of the Stenographer | :- | **Shivam B. Patange (L.G.)** |
| 2. Court Name | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Malegaon |
| 3. Order dated | :- | 24.04.2026. |
| 3. Order Signed by the P.O. | :- | 24.04.2026. |
| 4. Order uploaded on | :- | 24.04.2026. |

....